सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४

(दिनांक १५ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित)

(Maharashtra Act No. XX of 1974)

# THE MAHARASHTRA INCREASE OF LAND REVENUE AND SPECIAL ASSESSMENT ACT, 1974

*(As modified upto the 15th Sept., 2011)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४
यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०१२

[ किंमत रु. ५/- ]

# महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४.

## अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.

१. संक्षिप्त नाव आणि व्याप्ती.

२. व्याख्या.

३. जमीन महसुलात वाढ बसविणे व ती वसूल करणे.

४. विशेष आकारणीतील वाढ बसविणे व ती वसूल करणे.

५. जमीन महसूल आणि विशेष आकारणी यामधील वाढ देण्यासंबंधीची जबाबदारी.

६. विवरणे सादर करणे.

७. तहसीलदाराने आकारणी सूची तयार करणे.

८. विवरण सादर करण्यात कसूर करणे.

९. पुनरीक्षण.

१०. जमीन महसूल अधिनियमाचे उपबंध विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ लागू असणे.

११. जमीन महसुलातील किंवा विशेष आकारणीतील वाढ निलंबित करणे किंवा त्याची माफी देणे.

१२. पूर्णांकनासाठी तरतुदी.

१३. नियम करण्याचा अधिकार.

# सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.[१]

## [महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबात अधिनियम, १९७४]

(या अधिनियमास राज्यपाल यांची दिनांक २४ एप्रिल १९७४ रोजी अनुमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग-चार मध्ये दिनांक २९ एप्रिल, १९७४ रोजी प्रथम प्रसिध्द करण्यात आला.)

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :-

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (१०-६-१९७५)*

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (२६-१-१९७९)*

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (८-७-१९८६)*.

**[२][राज्यातील विवक्षित धारण जमिनींवर जमीन महसुलात वाढ करण्यासाठी तसेच महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२ याखाली शेतजमिनींवर बसविलेल्या विशेष आकारणीच्या रकमेवर बसवावयाच्या जमीन महसुलातही वाढ करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.]**

**ज्याअर्थी,** [२][राज्यातील विवक्षित धारण जमिनींवर] जमीन महसुलात वाढ करण्याची आणि महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२ याखाली शेतजमिनींवर बसविलेल्या विशेष आकारणीच्या रकमेवर बसवावयाच्या जमीन महसुलातही वाढ करण्याची आणि पूर्वोक्त विशेष प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :– १९६२ चा महा. २७.

संक्षिप्त नाव आणि व्याप्ती. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

व्याख्या. **२.** (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,–

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता महाराष्ट्र शासनाचे राजपत्र, १९७४, भाग पाच, इंग्रजी पृष्ठ ७५८ पहा.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, अनुसूची याद्वारे "राज्यातील सर्वसाधारण जमीन महसूल आणि शेत जमिनींच्या संबंधात बसविलेला स्थानिक उपकर यांच्या एकूण रकमेवर बसवावयाच्या" या मजकुराऐवजी "राज्यातील विवक्षित धारण जमिनींवर" हा मजकूर दाखल करण्यात आला.

* अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[१][* * * *]

(ब) "आकारणी सूची" म्हणजे कलम ७ खाली तयार केलेली सूची;

(क) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६;

(ड) (एक) या अधिनियमाच्या कलम ३ च्या प्रयोजनांसाठी कोणत्याही जमिनीच्या संबंधात "धारक" म्हणजे त्या अधिनियमाखाली राज्य शासनास प्रथमतः जमीन महसूल देण्यास पात्र असेल अशी मालक म्हणून किंवा कूळ म्हणून कायदेशीररीत्या जमीन जिच्या कब्जात असेल (मग असा कब्जा प्रत्यक्षात असो किंवा नसो) अशी व्यक्ती; आणि १९६६ चा महा. ४१.

(दोन) या अधिनियमाच्या कलम ४ च्या प्रयोजनांसाठी, कोणत्याही जमिनीच्या संबंधात "धारक" म्हणजे [२][ महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ याचे कलम ४, खंड (ब) ] अन्वये ज्या जमिनीवर विशेष आकारणी बसविण्यास आली असेल अशी जमीन जिच्या प्रत्यक्ष कब्जात असेल अशी व्यक्ती, आणि तद्नुसार "धारण जमीन" या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ लावण्यात येईल. १९६२ चा महा. २७.

[१][* * * * *]

(फ) "विशेष आकारणी" म्हणजे राज्यातील सर्व शेतजमिनींवर [२][ महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ याचे कलम ४, खंड (ब) ] अन्वये बसविण्यात आलेली विशेष आकारणी. १९६२ चा महा. २७.

(ग) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले.

(२) ह्या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना अनुक्रमे त्या अधिनियमात किंवा यथास्थिति, [३][ महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी ] (उपकर) अधिनियम, १९६२ यात जो अर्थ नेमून दिला असेल तोच त्याचा अर्थ असेल. १९६२ चा महा. २७.

जमीन महसुलात वाढ बसविणे व ती वसूल करणे.

[४][ **३.** या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, १ ऑगस्ट १९७५ रोजी आणि तेव्हापासून [५][ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये ] रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारी साधनसंपत्ती उभारण्याच्या प्रयोजनार्थ, स्वतःच्या धारण जमिनीच्या बाबतीत धारकाकडून देय असलेल्या जमीन महसुलाची रक्कम पुढील दरांनुसार वाढविण्यात येईल :- १९७८ चा महा. २०.

---

[१] सन् १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, अनुसूची याद्वारे खंड (अ) व (ई) वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाद्वारे "महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या अनुसूची याद्वारे "महाराष्ट्र शिक्षण" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या अनुसूचीद्वारे मूळ कलमाऐवजी कलम ३ दाखल करण्यात आले.

[५] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १३, अनुसूचीद्वारे "महाराष्ट्र राज्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| जेव्हा धारण जमीन– | वाढीचा दर |
|---|---|
| (१) ८ हेक्टर किंवा अधिक परंतु १२ हेक्टर पेक्षा कमी असेल तेव्हा. | अशा जमिनीच्या बाबतीत देय असलेल्या जमीन महसुलाचा ५० टक्के. |
| (२) १२ हेक्टर किंवा अधिक असेल तेव्हा. | अशा जमिनीच्या बाबतीत देय असलेल्या जमीन महसुलाच्या १०० टक्के.] |

**४.** या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, दिनांक १ ऑगस्ट १९७४ रोजी व त्या दिनांकापासून धारकाकडून देय असलेल्या शेतजमिनीवरील विशेष आकारणी पुढील दराने वाढविण्यात येईल :- विशेष आकारणीतील वाढ बसविणे व ती वसूल करणे.

| देय विशेष आकारणीची रक्कम | | वाढीचा दर |
|---|---|---|
| (अ) रुपये २०० पेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत | .. | काही नाही. |
| (ब) रुपये २०० पेक्षा अधिक परंतु रुपये ५०० पेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत. | .. | रुपये २०० पेक्षा अधिक होत असेल अशा रकमेच्या २५ टक्के. |
| (क) रुपये ५०० पेक्षा अधिक परंतु रुपये १,००० पेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत. | .. | रुपये ७५ पेक्षा **अधिक** रुपये ५०० पेक्षा अधिक असेल अशा रकमेच्या ५० टक्के. |
| (ड) रुपये १,००० पेक्षा अधिक परंतु रुपये २,००० पेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत. | .. | रुपये ३२५ पेक्षा **अधिक** रुपये १,००० पेक्षा अधिक असेल अशा रकमेच्या १०० टक्के. |
| (ई) रुपये २,००० पेक्षा अधिक असेल त्या बाबतीत. | .. | रुपये १,३२५ पेक्षा **अधिक** रुपये २,००० पेक्षा अधिक असेल अशा रकमेच्या १५० टक्के. |

**५.** (अ) या (जमीन महसूल) अधिनियमाखालील, सर्वसाधारण जमीन महसूल देण्यास पात्र असतील अशा व्यक्तींवर कलम ३ खालील जमीन महसुलातील वाढ बसविण्यात आणि ती वसूल करण्यात येईल. जमीन महसूल आणि विशेष आकारणी यामधील वाढ देण्यासंबंधीची जबाबदारी.

(ब) [१][ महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी ] (उपकर) अधिनियम, १९६२ खालील विशेष आकारणी देण्यास पात्र असतील अशा व्यक्तींवर, कलम ४ खालील विशेष आकारणीतील वाढ बसविण्यात आणि ती वसूल करण्यात येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, अनुसूची याद्वारे "महाराष्ट्र शिक्षण" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

विवरणे सादर करणे.

**६.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर आणि त्यानंतर प्रत्येक उत्तरवर्ती वर्षाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर [१] [ ज्या व्यक्तीची धारण जमीन ८ हेक्टर किंवा अधिक आहे आणि जी ] दोनशे रुपयांपेक्षा अधिक होत असेल अशी विशेष आकारणीची रक्कम देण्यास पात्र असेल अशी प्रत्येक व्यक्ती, राज्यात तिने धारण केलेल्या सर्व जमिनी सर्वसाधारण जमीन महसुलाची रक्कम [२] [ * * * ] व विशेष आकारणी (कोणतीही असल्यास) आणि विहित करण्यात येतील अशा इतर बाबी, या संबंधीचा तपशील अंतर्भूत असणारे, विहित नमुन्यातील, [३] [ कलम ७ च्या तरतुदींच्या अधीन राहून,एक विवरण-

(अ) मुंबई शहरात जिल्हाधिकारी याबाबतीत लेखी आदेशाद्वारे पदनिर्देशित करील अशा महसूल अधिका-यास देईल; आणि

(ब) इतर ठिकाणी; तहसीलदारास देईल. ]

राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमील अशा तारखेपूर्वी, उक्त विवरण सादर करण्यात येईल.

[मुंबई शहरातील १९७४ ते १९८५ या वर्षापर्यंतची विवरणे सादर करणे.

[४][**६.-अ** (१) महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यांमध्ये वाढ करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९८६ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी असलेल्या कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिची धारण जमीन ८ हेक्टर्स किंवा त्याहून अधिक असेल अशी प्रत्येक व्यक्ती आणि मुंबई शहरातील, रु. दोनशेपेक्षा अधिक होत असेल अशी विशेष आकारणीची रक्कम देण्यास जी पात्र आहे अशी प्रत्येक व्यक्ती आणि जिने या कलमान्वये १९७४ ते १९८५ या वर्षांची (ही दोन्ही वर्षे धरून) विवरणे तहसीलदारास देणे आवश्यक होते अशी व्यक्ती, जिल्हाधिकारी याबाबतीत लेखी आदेशाद्वारे पदनिर्देशित करील अशा अधिका-यास अशी सर्व विवरणे १ ऑक्टोबर, १९८६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करील. १९८६ चा मह. २७.

(२) कलम ८ मधील कोणत्याही गोष्टीमुळे, अशी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र, 'जमीन महसूल व विशेष आकारणी यांमध्ये वाढ करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९८६' याच्या प्रारंभापूर्वी कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत विवरणे दाखल करण्यात कसूर केल्याबद्दल अपराधी ठरणार नाही. ] १९८६ चा म २७.

तहसीलदाराने आकारणी सूची तयार करणे.

**७.** (१) कलम ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विवरणांच्या आणि अभिलेखांमधून उपलब्ध होईल अशा इतर माहितीच्या आधारावर, तहसीलदार, राज्य शासन निदेश देईल अशा तारखेपूर्वी, दरवर्षी एक सूची (यात यानंतर जिचा "आकारणी सूची" असा निर्देश करण्यात आला आहे) तयार करवील. अशा आकारणी सूचीमध्ये, ज्या व्यक्ती, या अधिनियमाच्या, कलम ३ अन्वये बसविण्यात आलेली जमीन महसुलातील वाढ आणि कलम ४ अन्वये बसविण्यात आलेली, विशेष आकारणीतील वाढ देण्यास पात्र असतील अशा, त्याच्या अधिकारितेतील प्रत्येक गावातील सर्व व्यक्तींची नावे, अशा १९८६ चा म २७.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या अनुसूचीद्वारे "आणि त्यावर बसविलेला स्थानिक उपकर" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे कलम "६-अ" समाविष्ट करण्यात आले.

व्यक्तींची नावे, अशा व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीच्या संबंधात देय असलेला सर्वसाधारण जमीन महसूल, [१][ * * * ] आणि विशेष आकारणी आणि अशा व्यक्तींच्या धारण जमिनीत अंतर्भूत होणाऱ्या जमिनींच्या संबंधात बसविण्याजोगी जमीन महसुलातील आणि विशेष आकारणीतील वाढीची रक्कम आणि विहित करण्यात येतील अशा इतर बाबी, अंतर्भूत असतील.

(२) कोणत्याही धारकाच्या एकाच जिल्ह्यातील दोन किंवा अधिक तालुक्यात जमिनी असतील त्याबाबतीत, जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे संबोधित करील अशा तहसीलदारास आकारणी सूची तयार करता येईल;

(३) कोणत्याही धारकाच्या एकाच महसूल विभागातील दोन किंवा अधिक जिल्ह्यात जमिनी असतील त्याबाबतीत, आयुक्त लेखी आदेशाद्वारे संबोधित करील अशा तहसीलदारास आकारणी सूची तयार करता येईल;

(४) कोणत्याही धारकाच्या निरनिराळ्या महसूल विभागात जमिनी असतील त्याबाबतीत, राज्य शासन लेखी आदेशाद्वारे संबोधित करील अशा तहसीलदारास आकारणी सूची तयार करता येईल;

(५) आकारणी सूची तयार करण्यात आल्यानंतर, ती संबद्ध गावांमध्ये प्रसिध्द करण्यात येईल आणि तीत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अशा प्रसिध्दीच्या तारखेपासून तीस दिवस मुदतीच्या आत, अशा सूचीच्या किंवा तिच्यातील कोणत्याही तपशीलाच्या अचूकतेबद्दल विवाद निर्माण करणारा कोणताही अर्ज केला नसेल तर, अशी सूची, या अधिनियमाच्या कलम ९ च्या उपबंधास अधीन राहून, अंतिम असेल;

(६) कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने पूर्वोक्त मुदतीच्या आत अशा कोणत्याही सूचीच्या किंवा तिच्यातील तपशीलाच्या अचूकतेबद्दल विवाद निर्माण करणारा अर्ज तहसीलदाराकडे केला असेल तर, तहसीलदार, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राज्य शासन निदेश देईल अशा रीतीने त्या विवादाचा निर्णय करील.

(७) तहसीलदाराचा निर्णय, असा तहसीलदार ज्या जिल्हाधिकाऱ्यास दुय्यम असेल त्या जिल्हाधिकाऱ्याकडे [ आणि पोट-कलमे (३) आणि (४) खाली येणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत, राज्य शासनाकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे ] केलेल्या कोणत्याही अपिलास किंवा या अधिनियमाच्या कलम ९ खालील कोणत्याही पुनरीक्षणाच्या कार्यवाहीस अधीन राहून, अंतिम असेल.

(८) तहसीलदाराचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अपील करण्यात येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, अनुसूचीद्वारे "स्थानिक उपकर" हा मजकूर वगळण्यात आला.

[१] [ **स्पष्टीकरण** .- या कलमाच्या व कलमे ८, ९ आणि ११ यांच्या प्रयोजनांसाठी, यामध्ये वापरण्यात आलेल्या "तहसीलदार" या शब्दप्रयोगामध्ये, संदर्भानुसार आवश्यक असेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्याने कलम ६ किंवा कलम ६-अ अन्वये पदनिर्देशित केलेल्या महसूल अधिकाऱ्याचा समावेश करण्यात येईल.]

विवरण सादर करण्यात कसूर करणे.

**८.** (१) या अधिनियमाच्या [२] [ कलम ६ किंवा कलम ६-अ द्वारे] आवश्यक असल्याप्रमाणे एखादे विवरण सादर करण्यात एखादी व्यक्ती--

(अ) [३] [ कलम ६ किंवा प्रकरणपरत्वे कलम ६-अ यामध्ये ] विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत, तसे करण्यास वाजवी कारणाशिवाय कसूर करील त्याबाबत, किंवा

(ब) जे विवरण खोटे असल्याचे तिला माहीत असेल किंवा खोटे असल्याचे तिला सकारण वाटत असेल ती व्यक्ती, पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी किंवा अशा जमिनींच्या संबंधात तिच्याकडून देय असलेली जमीन महसुलातील किंवा यथास्थिति, विशेष आकारणीतील वाढीची रक्कम या दोहोंपैकी जी अधिक असेल ती रक्कम शास्तीदाखल देण्यास पात्र असेल.

(२) ज्या धारकाने विवरण सादर करणे आवश्यक आहे अशा कोणत्याही धारकाने, तसे करण्यात वाजवी सबबीशिवाय कसूर केली आहे किंवा जे खोटे असल्याचे त्यास माहीत असेल किंवा जे खोटे असल्याचे त्यास सकारण वाटत असेल असे विवरण सादर केले आहे, असे तहसीलदारास सकारण वाटेल तर, तहसीलदार, अशा धारकावर नोटीस बजावील आणि त्या नोटिशीद्वारे या कलमाच्या पोट-कलम (१) द्वारे उपबंधित करण्यात आलेली शास्ती त्याच्यावर का लादण्यात येऊ नये, याबाबतचे कारण, नोटीस बजावल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, दाखविण्यास फर्मावील. उत्तर किंवा दाखविण्यात आलेले इतर कारण विचारात घेतल्यानंतर, तहसीलदाराची अशी खात्री होईल की, वाजवी सबबीशिवाय त्या व्यक्तीने वेळेवर विवरण सादर करण्यात कसूर केली आहे किंवा जे खोटे असल्याचे त्यास माहीत होते किंवा खोटे असल्याचे त्यास सकारण वाटत होते असे विवरण सादर केले आहे तर, त्यास, लगतपूर्ववर्ती पोट-कलमामध्ये तरतूद करण्यात आलेली शास्ती लादता येईल आणि आदेशाच्या तारखेपासून एक महिना मुदतीच्या आत, सर्व तपशीलाच्या बाबतीत परिपूर्ण असे खरे आणि अचूक विवरण सादर करण्यास त्यास फर्माविण्यात येईल.

(३) तहसीलदाराकडून अशारीतीने देण्यात आलेल्या मुदतीच्या आत आदेशाचे पालन करण्यात ती व्यक्ती कसूर करील तर, तहसीलदार त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशा व्यक्तीकडून देय असलेल्या जमीन महसुलातील किंवा विशेष आकारणीतील वाढीची रक्कम आपल्या पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार ठरवील आणि तद्नुसार आकारणी सूचीत सुधारणा करील.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) द्वारे "कलम ६ द्वारे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे "त्या कलमामध्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अशी व्यक्ती विवरण सादर करण्यात किंवा सर्व तपशीलाच्या बाबतीत पूर्ण असलेले खरे आणि अचूक विवरण सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती म्हणून एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी किंवा अशा व्यक्तींकडून वसुलीयोग्य असलेल्या अशा वाढीच्या रकमेच्या दुप्पट रक्कम या दोहोंपैकी जी अधिक असेल इतकी रक्कम आणखी शास्ती म्हणून देण्याससुध्दा पात्र असेल.

(४) या कलमाच्या पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) खालील तहसीलदाराचा निर्णय, असा तहसीलदार ज्या जिल्हाधिकाऱ्यास दुय्यम असेल त्या जिल्हाधिकाऱ्याकडे [ आणि या अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खाली येणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत राज्य शासनाकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे ] केलेल्या कोणत्याही अपिलास किंवा या अधिनियमाच्या कलम ९ खालील कोणत्याही पुनरीक्षणाच्या कार्यवाहीस अधीन राहून अंतिम असेल.

(५) तहसीलदाराचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अपील करण्यात येईल.

पुनरीक्षण.

**९.** (१) राज्य शासनास (किंवा शासनाच्या उप-सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा इतर अधिकाऱ्यास) स्वाधिकारे किंवा अर्ज मिळाल्यानंतर, कोणत्याही तहसीलदाराने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निर्णयाचे अभिलेख मागविता येतील व ते तपासता येतील आणि शासनाला किंवा त्या अधिकाऱ्याला न्याय्य आणि समुचित वाटतील असे आदेश त्यावर देता येतील :

परंतु, या कलमाखालील कोणताही अर्ज, आदेशाच्या तारखेपासून सहा महिने मुदतीच्या आत तो करण्यात आला नसेल तर, दाखल करून घेतला जाणार नाही :

आणखी असे की, अशा कोणत्याही आदेशाच्या पुनरीक्षणाचा अर्ज फेटाळण्यापूर्वी, राज्य शासन किंवा यथास्थिति, संबोधित अधिकारी, अशा फेटाळणीबद्दलची कारणे नमूद करील.

(२) या कलमाखालील ज्या कोणत्याही आदेशामुळे कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल त्या व्यक्तीस, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी राज्य शासनाने किंवा यथास्थिति, संबोधित अधिकाऱ्याने दिली नसेल तर, असा कोणताही आदेश संमत करण्यात येणार नाही.

(३) एखाद्या व्यक्तीस अपील दाखल करता येत असेल आणि तिने कोणतेही अपील दाखल केले नसेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीच्या अर्जावरून पुनरीक्षणविषयक कोणतेही कामकाज दाखल करून घेतले जाणार नाही.

जमीन महसूल अधिनियमाचे उपबंध, विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ लागू असणे.

**१०.** जमीन महसूल अधिनियमाचे उपबंध, यात यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत असेल त्याशिवाय, या अधिनियमाखाली बसविण्यात व वसूल करण्यात येईल अशी, जमीन महसुलात किंवा विशेष आकारणीत केलेली वाढीची रक्कम आकारणी सूचीत विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींकडून वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ, जणू उक्त वाढीची रक्कम ही (जमीन महसूल) अधिनियमाखाली देय असलेला जमीन महसूल असल्याप्रमाणे लागू होतील.

जमीन महसूलातील किंवा विशेष आकारणीतील वाढ निलंबित करणे किंवा याची माफी देणे. पूर्णांकनासाठी तरतुदी.

**११.** या अधिनियमान्वये जमीन महसुलातील किंवा यथास्थिति, विशेष आकारणीतील वाढ देण्यास जी पात्र असेल अशा व्यक्तीच्या जमिनीच्या बाबतीत देय असलेल्या सर्वसाधारण जमीन महसुलाचे प्रदान, कोणत्याही वर्षी, कोणत्याही कारणामुळे निलंबित करण्यात येईल किंवा त्याची माफी देण्यात येईल तेव्हा, तहसीलदार तत्सम अशा वाढीच्या निलंबनासंबंधात किंवा माफीसंबंधात आदेश देईल.

१२. या अधिनियमान्वये देय असलेल्या जमीन महसुलाच्या किंवा विशेष आकारणीच्या रकमेतील वाढीची गणना करताना, बसविण्यायोग्य रकमेचे, आवश्यक असेल तेथे, निकटतम रुपयात पूर्णांकन करण्यात येईल, पन्नास किंवा त्याहून अधिक पैशांची एक रुपया अशी गणना करण्यात येईल व पन्नासपेक्षा कमी पैसे विचारात घेतले जाणार नाहीत.

नियम करण्याचा अधिकार.

१३. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) नियम करण्यासाठी या कलमान्वये प्रदान करण्यात आलेला अधिकार हा त्याच्या वापराचा पहिला प्रसंग असेल त्याशिवाय, पूर्वप्रसिद्धीनंतर नियम करण्यात येतील, या शर्तीस अधीन असेल.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, आणि **शासकीय राजपत्रात** असा निर्णय अधिसूचित केला असेल, तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे, उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

PRINTED AT THE GOVERNMENT PHOTOZINCO PRESS, PUNE.